# उद्याचा आयुर्वेद

## अपेक्षा आणि कर्तव्ये

॥ श्रीः ॥

# उद्याचा आयुर्वेद अपेक्षा आणि कर्तव्ये

''नमामि धन्वन्तरिं आदि देवं सुरासुरैर्वंदित पादपद्मम्।
लोके जरारुक् भयमृत्युनाशनं धातारमीशं विविधौषधीनाम्।।''

नमस्कार ....

एक आयुर्वेदीय विद्यार्थी या नात्याने धन्वंतरी देवतेला स्मरुन मी माझ्या या लेखनाला सुरुवात करीत आहे. कोणत्याही गोष्टीविषयी अभ्यास करताना, सर्वात पहिल्यांदा विचार केला जातो तो त्याच्या मुळाचा. म्हणजेच त्या गोष्टीच्या उत्पत्ती विषयीचा... सांगण्यामागचं कारण अस की, मी हातात लेखणी आणि कागद का घेतला?

व्हाटस्अॅप वर मला मॅसेज फॉरवर्ड झाला. '' कै. बिंदु माधव कट्टी निबंध स्पर्धा'' आयोजित करण्यात आली आहे. असाच वाचत वाचत खाली गेलो आणि निबंधाचे विषय डोळ्यासमोर आले . जरा घाबरतच पहिला विषय पाहिला. जरा थोडासा जड वाटला, म्हणून पुढे गेलो पुढचा वाचला तर अरे बापरे हे दोन विषय तर ग्रंथाला आधारुनच आहेत, जमेल का आपल्याला... असा विचार डोक्यात चालत असतानाच तिसरा विषय पाहिला आणि तो पाहुन थोडा धक्काच बसला आणि विषय ज्यांनी निवडले त्यांनी असा वेगळा विषय... हा म्हणजे वेगळा म्हणता येणार नाही. पण असा ज्वलंत प्रश्न त्यांना या निबंध स्पर्धेत ठेवाव असं का वाटलं? असं क्षणभर वाटल गेलं आणि ठरवलं लिहुया या विषयावर ''उद्याचा आयुर्वेद अपेक्षा आणि कर्तव्ये'' जरा थोडी उमेद आली की थोडं फार लिहू शकतो यावर आपण. पण तेंव्हा हळु हळु जेंव्हा ''अपेक्षा'' आणि ''कर्तव्य'' या विषयावर मनात विचार घोळु लागले आणि मी हे मत मांडू शकतो, असं लिहू शकतो असं वाटु लागलं तेंव्हाच मध्ये गाडी अडकली ती ''उद्याचा आयुर्वेद'' ह्या दोन शब्दांनी मनात विचार केल्याने. नंतर मग जरा स्वत:चीच लाज वाटायला लागली. विषय निवडणाऱ्या गुरुजनांबद्दल अतिशय आदर निर्माण झाला. आता तुम्ही म्हणाल आदर निर्माण झाला म्हणजे नमके काय रे बाबा...? आधी आदर वाटत नव्हता असं आहे का? असा गैरसमज करुन घेऊ नका''अतिशय'' हे विशेषण यासाठीच घातलं आहे. म्हणजे आधी ही आदर होता ही तंत्रयुक्ती लावून घेण्यास हरकत नक्कीच नाही असं मला वाटतं... असो विषयांतर नको.

मला लाज वाटण्याचं कारण असं की... आम्हा विद्यार्थीदशेतल्या वैद्यगणांना सत्व, बुध्दिमान चरकादि ग्रंथकारांनी लिहिलेला आयुर्वेद अजुन पूर्णपणे समजलेला नाही. त्यांचा जेवढा अभ्यास करावा तितका कमीच..असं समीकरण असताना...चरकादि आयुर्वेद नाही..सद्यस्थितीलाही नाही.. चक्क उद्याचा आयुर्वेद यावर लिहिण्याचा आमचा काय अधिकार? तो लिहिण्यासाठी आधी आम्हाला त्या पातळीवर जावं लागेल. माझे गुरुजन नेहमी सांगत असतात, जोपर्यंत आपण स्वत: एखाद्या गोष्टीत परिपूर्ण नसतो तोपर्यंत ती गोष्ट इतरांना सांगण्यास आपल्याला काहीही एक अधिकार नसतो. तसा सृष्टीचा नियमच आहे. नाहीतर पायाखालची माती कधी सरकून जाईल आणि आपण कधी तोंडावर आपटू याचा काही नेम नाही. आणि याच मुलत: कर्तव्याबद्दल प्रत्येक आजच्या आणि उद्याच्या वैद्याने विचार करावा असं मला वाटतं. आणि हाच सिध्दांत मनाशी बाळगून अस ठरवलं की आधी स्वत: ग्रंथाभ्यास करुन ग्रंथाधार नक्कीच मिळेल.

आयुर्वेदोपदेशेषु विधेय: परमादर:। (अ.न्हू.सू.१)

आयुर्वेदिय उपदेशांविषयी अत्यंत आदर बाळगावा. हे सूत्र प्रथम उल्लेखित करण्यामागचं कारण असं की या विषयाला अनुसरुन असल्याने हे तितकचं महत्वाचं आहे. प्रत्येक सत्य हे प्रत्यक्ष नसतं, त्यांचा अन्य प्रमाणांच्या मदतीने सिध्द करावे लागते आणि असे सत्य जे प्रत्यक्ष, अनुमान आणि आप्तोपदेश प्रमाणांनी

Anant Ayurveda Pratishthan

सिध्द होते ते सत्यच असते आणि त्यावर दृढ विश्वास ठेवणं हे सर्वात महत्वाच असतं. त्यावर श्रध्दा असणं गरजेच असजं, कारण जिथे श्रध्दा तिथे परमादर आणि हिच गोष्ट आजच्या विद्यार्थीवर्गाकडून म्हणजेच उद्याच्या वैद्यांकडून होणे अपेक्षित आहे. आपल्या ग्रंथांवर श्रध्दा ठेवा..अभ्यास करा.. नक्कीच ते तुम्हाला भविष्यात योग्य मार्ग दाखवतील.''दाखवतील'' असा शब्दप्रयोगही इथे मला जरा चुकीचा वाटतो. दाखवतील नव्हे, ''योग्य मार्गावरुनच नेतील''. जसा अर्जुनाने श्रीकृष्णाचा परमादर केला तसाच. अर्जुनालाही विश्वास होता की श्री भगवान कृष्ण जो काही उपदेश देतील ते हितासाठीच.. म्हणून त्यांच्या शब्दांचा परमादर करुन त्यांच्या आज्ञा अर्जुनाने पाळल्या आणि पुढे काय घडलं हे आपणा सर्वांना ठाऊकच आहे. नेमके तसेच आपल्या आयुर्वेदाबद्दलही मला वाटते. मलाच नाही ग्रंथकारांनीही हीच भावना व्यक्त करुन.. या ''आयुर्वेदोपदेशेषु विधेयः परमादरः।'' या श्लोकाची सुरुवातीलाच रचना केलेली आहे. त्याच्या या रचना, तंत्रयुक्तीशिवाय वाचत जाणे म्हणजे डोळे बंद करुन वाचण्यांसारखे आहे. ग्रंथकारांची तशी अपेक्षा होती, आजही आहे आणि उद्याही असेल. त्याप्रमाणे अनेक प्रतिष्ठित वैद्यांनी त्यानुसार कर्तव्ये पार पाडली. आजही त्यानुसार कर्तव्ये पार पाडली जात आहेत, आणि उद्याही प्रत्येक आयुर्वेदिय विद्यार्थ्यांकडून आणि वैद्यगणांकडून हे कर्तव्य पार पाडलं जाईल हि अपेक्षा.

वैद्य धर्माधिकारी सर यांच्या 'चरक ऊहन' या पुस्तकातलं एक वाक्य मला आवर्जून येथे नमूद करावसं वाटतं ते म्हणजे''आयुर्वेदिय सिध्दांतावर परमश्रध्दा असली तरच आयुर्वेदाचा उत्तम अभ्यास होईल. उत्तम अभ्यास झाला तरच शास्त्र समजेल. शास्त्र समजले तरच यश, दीर्घ आरोग्य, आयुष्य समाजाला मिळेल.'' हे वाचताना मला अजून एक गोष्ट नमूद करावीशी वाटते की आपण जे काही करणार आहोत ते समाजासाठीच, अशी भावना आज प्रत्येक वैद्याने आपल्या उराशी बाळगून ठेवली पाहिजे आणि त्यानुसार आपली विचार आणि कार्यप्रणाली चालु ठेवली पाहिजे. कारण आर्थिकतेकडे कल वाढत चालला आहे, आणि त्यामुळे आयुर्वेद हा समाजासाठी...याऐवजी आयुर्वेद हा आर्थिकतेसाठी हे समीकरण पुढे कोणत्याही वैद्याच्या मनात बिंबवले जाऊ नये. कारण आज तशा समीकरणानुसार चालणारे आपल्या आजुबाजुला तुम्हा आम्हाला बरेच दिसून येतात. वेळीच यावर विचार करुन उद्याचा प्रत्येक वैद्याने या समीकरणाला तडा देऊन, 'आयुर्वेद हा समाजासाठीच' हे कर्तव्य अंगी जोपासले पाहिजे.

चरकाचार्य म्हणतात,

कुर्वते ये तु वृत्यर्थं चिकित्सापण्यविक्रयः।
ते हित्वा कांचनं राशि पांशुराशिमुपासते ।।

(च.चि.१/४/५९)

अर्थातः पैशासाठी चिकित्सा ही व्यवहार रुपात करणारे वैद्य हे सोन्याची रास सोडून वाळूच्या राशिमागे लागलेले असतात.

हे एवढं सगळं लिहित असतानादेखील मला एक गोष्टीविषयी आपणाला सांगावस वाटतं. '

'सोऽयं आयुर्वेदः शाश्वतो निर्दिश्यते ।(च.सू.३०/२७)''

आयुर्वेद हा शाश्वत आहे. आयुर्वेद हा तर तोच असणार आहे आदिकालापासून तोच आहे आणि पुढेही तोच राहणार आहे. मग उद्याचा आयुर्वेद असा शब्दप्रयोग करण्यामागचं कारण काय याचा विचार कधी केला आहे का ? केला नसेल तर प्रत्येकाने तो करावा. कारण बदलत चाललो आहोत ते आपण...मनुष्यगण

'आयुषः वेदः आयुर्वेदः'

कोणाच्या आयुष्याविषयी बोललं जातय इथे? आपल्याचं ना? मग दृढ मनाने विचार केला तर,

Anant Ayurveda Pratishthan

विषयाचा सार भाग ''उद्याचा मनुष्य अपेक्षा आणि कर्तव्ये '' असा असेल असा विचार करणं काही वावगं ठरणार नाही. काय ? बरोबर ना ?

वैद्य परिक्षित शेवडे यांच्या एका व्याख्यानामध्ये ऐकण्यात आलं होतं.

'' शस्त्रेण रक्षिते राष्ट्रे, शास्त्र चिंता प्रवर्तते ''

असा महाभारतात उल्लेख केला गेला आहे आणि आपल्या शास्त्राची रक्षा करणे हे उद्याच्या प्रत्येक वैद्यासमोर एक मोठं आव्हान आहे. कारण सर्वात पहिल्यांदि आपले क्षेत्र, आपलं शास्त्र, आपला आयुर्वेद सुरक्षित आहे का याचा विचार करावा. मग शास्त्रार्थ करावा. शास्त्राचा प्रचार आणि प्रसार करावा. याला जोड हवी ती नक्कीच शास्त्राभ्यासाची. त्याशिवाय कोणतेही फलित घडून येवू शकणार नाही. कारण आजकाल आपल्या शास्त्रासोबत बऱ्याच कुरघोडी करण्याचा प्रयत्न काही अशास्त्रीयांकडून केला जातो. आणि याचे परिणाम म्हणजे जनमाणसात आयुर्वेदाबद्दलचे गैरसमज उत्पन्न होताना दिसतात, आणि हे असचं चालु राहिलं तर भविष्यात आयुर्वेदिय वैद्यांना बऱ्याच मोठ्या आव्हानांना सामोरे जावे लागण्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्यामुळे प्रथम आपल्या क्षेत्रात अशाप्रकारे घुसखोरी करणाऱ्यांना वेळीच हद्दपार करणं आणि आपली शास्त्रसीमा बळकट करणं हे एक दुसरं महत्वाचं कर्तव्य आजच्या आणि उद्याच्या वैद्यांसमोर आहे.

ग्रंथाधार घेऊनच लिहिण्याचा मानस हाती धरल्याने. आपल्या उद्याच्या आयुर्वेदाला भक्कम करण्यासाठीचे निज हेतू पहिल्यांदा उल्लेखित करतोय. मग आगंतु हेतुंचा विचार करण्यास हात सरसावेन अशी आशा देतो. पुढच्या विषयाकडे नंतर जातो.

''आयुर्वेदिय महाविद्यालया प्रवेश प्रक्रिया''

संदर्भात आलेला अनुभव हा आयुर्वेदासाठी एक विचार करण्याची गोष्ट आहे. वैद्यकीय प्रवेश प्रक्रिया परिक्षा दिल्यानंतर आणि त्यांचा निकाल घोषीत झाल्यानंतर सुरु होते ती प्रवेशाची धगधग आधीच १२वी सायन्सचा त्यातही NEET चा अभ्यास केल्यामुळे स्वत:मध्ये एक वेगळाच फुकटचा Attitude निर्माण झालेला असतो. तो सध्या तरी फुकटचाच म्हणेन, काहीही एक उपयोग नसतो त्याचा, असो. तर यानंतर सुरु होत कॉलेज सिलेक्शन प्रक्रिया. त्यात First Prefrence असतो तो MBBS आणि मग असतो BAMS. म्हणजे MBBS ला प्रवेश नाही मिळाला तर चला BAMS ला. सगळा म्हणजे बराचसा मध्यमवर्गीय (गुणवत्तेबाबत) लोट हा BAMS कडे येवून पडतो. मग काय झालं कुठेतरी एकदाचं प्रवेश. डॉक्टर तर बनणारच ना. या कुत्सित समाधानाने आणि मागे सांगितल्याप्रमाणे त्या फुकटच्या Attitude ने वावरु लागतात ही मुले. मीही त्यातलाच एक अनुभवी प्राणी होतो. आणि म्हणून आहे मांडू शकतोय.

पुढचा प्रवास चालू असतानाच...अजून एक ठळकपणे नमुद करण्यासारखी गोष्ट ती म्हणजे आयुर्वेदाचा Syllabus Pattern. बहुतांश वेळा असे मनात विचार आल्याशिवाय राहतच नाहीत ते म्हणजे या Syllabus Pattern मधून आयुर्वेदाला हळू हळू बांजूला सारण्याचा तर प्रयत्न काही (कुटीर फुटिरतावाद्यांकडून केला तर जात नाहीए ना ? हे प्रश्न उपस्थित करण्यामागचा हेतू हाच की आज हे जे काही डोळ्यांसमोर चाललं आहे, हे सगळं उद्याचा आयुर्वेदिक वैद्याला सक्षम बनवण्यास कितपत पोषक आहे की नाही, याबद्दल साशंकता बाळगण्याचं कारण नाही. जे आज डोळ्यासमोर दिसतय ते उद्याही चालू राहिलं तर परिस्थितीशी झुंजण्यासाठी उद्याचा प्रत्येक वैद्याला तयार रहावं लागणार आहे हे नक्की, एकीकडे सरकारची आयुर्वेदाबद्दलची डोळे झाकणी आणि दुसरीकडे १२ वी पर्यंत सायन्स शिकून अचानक येऊन आयुर्वेदाला शरण आलेले विद्यार्थी. आयुर्वेद म्हणजे काय ? इथपासून सुरुवात आणि हे कळता कळताच पहिले वर्ष संपते. त्यात संस्कृत काय वाचायचं डॉक्टर बनण्यासाठी आलोय इथे पाठशाळेत नाही आलोत, असे न्युनगंड हाताशी बाळगून अष्टांगहृदय, पदार्थविज्ञान यांचा अभ्यास एक तोंडओळखीपूरता होतो आणि इंग्रजी जवळच वाटतं म्हणून Anatomy & Physiology यांचा अभ्यास केला जातो. आणि पुढील ३ वर्षात काय काय

Anant Ayurveda Pratishthan

होतं त्याबद्दल अधिक सांगणे न लागे आणि या सगळयांमध्ये ग्रंथाभ्यास किती महत्वाचा याची जाणीव, याची प्रचीति येण्यासाठी जरा वेळ लागतो.

त्यातही आयुर्वेदाचा अभ्यास कसा करावा? याबद्दलचे मार्गदर्शन आज अनेक शास्त्रनिष्ठ असणाऱ्या वैद्यांकडून केले जाते. आजच्या प्रत्येक विद्यार्थ्याने त्या गोष्टींचा अभ्यास करुन त्याप्रमाणे आपलं शीलन करावं. वर उल्लेख केल्याप्रमाणे Syllabus Pattern ची असणारी अवस्था त्यातून अभ्यासासाठी अभ्यास आणि परिक्षेसाठीचा अभ्यास या दोन संकल्पनांचा नीट विचार करुन जर आज आमच्यासारख्या प्रत्येक आयुर्वेदिय विद्यार्थ्याने अभ्यास केला तर त्याला परिक्षेमध्ये चांगले गुण मिळविण्याचे उद्दिष्ट साधता येईल. एवढच नाही तर उद्याचा एक सक्षम आयुर्वेद वैद्य ही घडेल आणि कोणत्याही शास्त्राची प्रगती ही त्या शास्त्रासाठी सक्षमपणे झटणाऱ्या आणि आपली हौस शास्त्रामधून  पूर्ण करणाऱ्या लोकांवरच अवलंबून असते. आणि आयर्वेदाची अधोगती काही प्रमाणात होण्याचं कारणही हे अभ्यासासाठी अभ्यास  करणाऱ्या विद्यार्थ्यांचा अभाव. असं म्हणणं अनुचित ठरणार नाही. आजन्म विद्यार्थी राहणाऱ्यास या ''आनंदसागरामध्ये जलक्रिडा करण्याचे भाग्य लाभू शकेल''  हे वैद्य कोल्हटकर सरांच वाक्य आठवलं नाही तर नवलच. अशा गोष्टींची सवय विद्यार्थीदशेनतूच केली , तसे प्रयत्न केलं तरे अर्थातच चांगले होईल. विद्यार्थी दशेत असणारी शारिरीक व बौध्दिक  क्षमता, स्मरण शक्ती वेळ मिळण्याची शक्यता इत्यादि गोष्टी विद्यार्थीदशेत जितक्या अनुकूल तितक्या मोठेपणी सापडण्याची शक्यता कमीच. म्हणूनच अभ्यासाठी अभ्यास हा प्रकार विद्यार्थीदशेतूनच सुरु करणे हे अपेक्षित असलेल्या माणसाला हिताचे आहे. असे वैद्य कोल्हटकर सर म्हणायचे.

उद्याचा आयुर्वेद हा आजच्या पिढीतल्या विद्यार्थीवर्गावरच अवलंबून आहे. आजचा विद्यार्थी शास्त्रनिष्ठ असणे, म्हणजे उद्याचा आयुर्वेद सक्षम आणि प्रगतीपथावर असेल. हे समीकरण मनाशी बाळगलं तर वावग ठरु नये. आणि आज आपण उद्याच्या एखाद्या गोष्टीबद्दल अपेक्षा जेंव्हा ठेवतो किंवा तशी अपेक्षा ठेवायची असेल तर सर्वात पहिल्यांदी स्वत:पासूनच स्वत:त त्याप्रमाणे योग्य, शास्त्रपूरक बदल घडवून आणणं ही तितकच महत्वाचं आहे.

आज विद्यार्थीवर्ग दिवसाला किती वेळ आयुर्वेदासाठी देतो? देत नाही तर का देत नाही? पाठ-अवबोध-अनुष्ठान या त्रिसुत्रिय मार्गावरुन कितपत जातो? दिनचर्या, ऋतुचर्या कितपत पाळतो? शास्त्रावर विश्वास असेल तर शास्त्रानुसार वागत का नाही? असे बरेच प्रश्न मनात खोळंबतात. प्रत्येक आयुर्वेदीय व्यक्ती हा आयुष्यभर आयुर्वेदाचा विद्यार्थी म्हणून जगला तर आपण शास्त्रासाठी एवढं केल्यानंतर शास्त्राने आपल्याला प्रचंड काही देऊ केलं याची प्रचिती येऊ शकेल. शास्त्राभ्यास जेवढा करु तेवढा कमीच आणि शास्त्र किती मोठं आणि अफाट आहे याची अनुभतीही त्याचबरोबर येईल. ग्रंथातून दिनचर्या अध्याय आपण अभ्यासतो आणि त्यानुसार कितीजन आपण तो पाळतो? मला वाटतं आपण ब्राम्हौ मुहूर्ताला उठून अध्ययन केलं तर. ग्रंथकारांनी ब्रम्हौ मुहुर्त अस का म्हटलं याची प्रचिती येईल. आणि ही अनुभूती झाली कि मग दिनचर्या पाळण्याची गरजच भासणार नाही ती आपल्याकडून सहजतेने घडून येईल. त्याचबरोबर आत्मपरिक्षणही प्रत्येक आयुर्वेदिय विद्यार्थ्याकडून घडून येणं तितकच महत्वाचं. विद्यार्थीदशेत असताना आयुर्वेद म्हणजे अहोरात्र हे समीकर बाळगण हे शास्त्रसेवा करण्यासारखच असेल.

आणि हे समीकरण जोपासणं हे तितकच अवघड आहे कारण आजकाल सोशल मेडियाचा वाढत चाललेला वापर आणि तोही अनावश्यक. Facebook, whatsapp, Twitter  आणि अजून बरचं काही आज फोफावत चाललय. त्यात आयुर्वेदीय ग्रुपही तयार झालेत. आणि शास्त्रचर्चाही घडवून आणल्या जातात. बदलत्या जगाप्रमाणे आधुनिकता आत्मसात करून शास्त्रासाठी काही करणं ही गोष्ट/बाब चांगली आहे. पण नाण्याच्या जशा दोन बाजू असतात तसेच इथंही याच्या अति आहारीही जाऊ नये. कारण

Anant Ayurveda Pratishthan

आजकाल बऱ्याच वैद्यामंध्ये Media Through चर्चा होतात. त्यात असणारा विद्यार्थीवर्गही त्यात इंटरेस्ट घेतो. घेणं चांगलं पण काहीवेळा असही घडून येतं की वैद्याकडून चर्चांव्दारे विद्यार्थीवर्गाला खाद्य पुरवलं जातं. विद्यार्थ्यांना या चर्चा म्हणजेच शास्त्र असं वाटू लागतं. आणि मग मुळ आयुर्वेद ग्रंथांतून अभ्यासायचा आहे ही गोष्टच विसरुन जातात. तरुण विद्यार्थी वर्गाने आजच्या आणि उद्याच्याही अशा गोष्टींना आहारी न गेलेलच बर असं मला वाटतं. सोबतचआजकाल अनेक जण यांचा वापर प्रचारासाठी करतात. आयुर्वेद प्रचारासाठी म्हणा किंवा आपल्या नव्याने सुरु केलेल्या रुग्णालयाच्या प्रचारासाठी म्हणा सहजरित्या अशा माध्यमातून जाहिरातबाज्या केल्या जातात. ही खेदजनक बाब आहे. आपला स्वत:चा आयुर्वेदावर, शास्त्रावर जर दृढ विश्वास असेल तर कोणीच अशाप्रकारे माध्मांव्दारे लोकांपर्यंत जाऊ नये. शास्त्राभ्यास चौकटपूर्ण असेल तर रोगी तुमच्याकडून पूर्णपणे बरे होऊन आणि तिच बरा होऊन गेलेली व्यक्ती तुमची शास्त्रपूरक जाहिरात असेल. कारण ती व्यक्ती आणखी एक दोघांना आयुर्वेद शास्त्राबद्दल चार गोष्टी चांगल्या सांगेल. आणि गरज असणाऱ्या रुग्णांना तुमच्यापर्यंत पोहचवेल. त्यावेळी मात्र त्यांची परिपूर्ण सेवा करुन त्यांना बरं करणं हे आपलं कर्तव्य याची जाणीव ठेवणं गरजेचं आहे.

उद्याच्या प्रत्येक वैद्याने आपलं कर्तव्य या नात्याने परिपूर्ण अभ्यास करुन नवाशिक्यांपर्यंत आवड निर्माण करुन ग्रंथ व आपले विचार यांची योग्य सांगड घालून आपली मते मांडावीत. गुरुकुल पध्दतीने आयुर्वेद प्रेम विद्यार्थ्यांमध्ये वाढवावे.

म्हटलंच आहे की,

''जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे, शहाणे करुन सोडावे सकळ जन ।''

या सगळया गोष्टींबरोबरच महत्वाची बाब आहे ती म्हणजे विद्यार्थी-बॅच जडणघडण . दोघांनीही आपली शास्त्रचौकट विस्तारुन जडणघडण केली पाहिजे.

दक्षस्तीर्थात्त शास्त्रार्थो दृष्टकर्मा शुर्चिभिषक्। (अ.सू.)

यातल्या काही गोष्टींचा उल्लेख माझ्याकडून वर झालाच आहे.

दृष्टकर्म (अरुणदत्त टीका):

'' बहुशो दृष्टं कर्म येन चिकित्सालक्षणं स दृष्टकर्मा-अभ्यस्तकर्मा शतशश्चिकित्सिरोग:।''

ही पण श्रेष्ठ वैद्य बनण्यामागची एक महत्वाची गोष्ट आहे. Clinical Experience जेवढा घ्यावा तेवढा कमीच. विद्यार्थीदशेत असताना व्दितीय वर्षापासून विद्यार्थ्यांनी जवळपासच्या /नजीकच्या आयुर्वेद Practice करणाऱ्या वैद्यांकडे जाऊन Clinical Experience घेणंही तितक महत्वाचं आह, जितका शास्त्राभ्यास. किंवा आपल्याला शिकवणाऱ्या गुरुजनांच्या रुग्णालयात जाऊन त्यांच्याकडून रुग्णपरिक्षण आत्मसात करावे. यातूनच ग्रंथ आणि प्रत्यक्ष पाहण्यात येणारे रुग्ण यांची सांगड कशी घालावी ही शिकवण आपल्याला आपल्या गुरुजनांकडून आत्मसात होते. आणि शास्त्राच्या मदतीची सुध्दा जाणीव होते. त्याचबरोबर विद्यार्थ्यांची आंतरवासीय वैद्य कालखंडात वेगवेगळ्या ग्रंथोक्त परिक्षणांचा अभ्यास करुन तो रुग्णांवर अभ्यासावा. ग्रंथ सोडून इतर आयुर्वेदिय पुस्तके, आयुर्वेद मासिके इत्यादिचे प्रगल्भ वाचन करावे. त्याचप्रमाण प्रत्येक कर्म (पंचकर्म) पाहून ते स्वत:वर करुन घेऊन आणि पूढे ते  रुग्णांना स्वत: देंऊन पाहावे. या सगळ्यांमधून आपल स्वत:चं धैर्य नक्कीच वाढतं आणि व्यापदं निर्माण होऊ नये आणि आलीच तरी काय दक्षता घ्यावी हे ही कळेल. हा एक मात्र खरं या सगळ्या गोष्टी सुरुवातीला आपल्या गुरुजनांच्या आदेशानुसारच कराव्यात.

सुश्रुताने उल्लेखित केलेले व्रणविज्ञान, व्रणशोधविज्ञान, व्रण नीट झाल्याची लक्षणे, व्रणावर करावयाचे बंध या सगळ्यांचा आज आपल्याकडून रुग्णांवर (व्रणित) विचार केला जातो का? हा सुश्रुताने

Anant Ayurveda Pratishthan

उल्लेखित केलेल्या बंधवस्तूंचा (झाडाची सालं, कातडे इ.) आज आपल्याला वापर करता येणार नाही पण आपण ड्रेसींग करतो तेंव्हा सुश्रुताने सांगितलेल्या इतर गोष्टीचे पालन करणे गरजेचे आहे. ग्रंथोक्त बंधाचा आजही विचार महत्वाचा आहे. सोबतच व्रण रुढ होतानाची रुग्णावर दिसणारी लक्षणे व ग्रंथोक्त लक्षणे यांची पडताळणी करुन पाहावी. सारासार विचार केला तर आंतरवासीय असताना प्रत्येक विद्यार्थ्याने दृष्टकर्मा या शब्दाला आपल्यामध्ये आत्मसात करण्यासाठीचे सगळे प्रयत्न केले पाहिजेत. तरच उद्याचा प्रत्येक वैद्य आपल्या शास्त्रोक्त चिकित्सेने रुग्णांना रोगोपशम मिळवून देईल. आणि जनमानसात आयुर्वेदाबद्दल एक आदर आणि प्रेम निर्माण करु शकेल.

वर उल्लेखलेल्या विद्यार्थीदशेतल्या बाबींपैकी आणखी एक महत्वाची आणि सध्याच्या काळातील गंभीर बाब म्हणजे आजच्या प्रत्येक विद्यार्थ्याने लक्षात ठेवणं गरजेचं आहे कि आपण उद्याचे वैद्य आहोत. आपण आयुर्वेदाचे प्रतिनिधी असणार आहोत. त्यानुसार आपल्या वर्तनात योग्य ते बदल केले पाहिजेत. आणि उद्याचा एक वैद्य म्हणून आपण आपला Status Symbol जपतोय का याचा गांभीर्याने विचार करणं गरजेचे आहे. अभ्यास, ग्रंथ, Clinical Experience, विद्यार्थी-वैद्य जडण घडण, अभ्यासक्रम पध्दती या सगळ्यांचा उहापोहातूनही मला Status Symbol बद्दल थोडफार सांगावस वाटल याचं कारण आजची स्टायलिश पिढी. आज बरेच तरुण मुले-मुली (आयुर्वेद विद्यार्थीवर्ग) नवीन नवीन हेअर स्टाईल, स्टायलीश ड्रेसेस ई. अनेक नमुद केल्यातर अखंड पान भरेल. अशाप्रकारे स्टाईल करुन कॉलेज मध्ये जातात. हेच मुलं-मुली उद्या स्वत:च्या रुग्णालयात एकदम स्टायलीश मध्ये जाऊन बसले तर रुग्णांना त्यांच्याबद्दल आदर वाटेल का? याबद्दलचा विचार तुम्हालाही उत्तर देऊन जाईल. Behaviors, Status Symbol आणि Personality Maintenance या  तीन बाबीही आयुर्वेद शास्त्र उन्नतीसाठी अतिशय महत्वाच्या आहेत. आणि आजच्या तरुण विद्यार्थीवर्गाने याचा परिपूर्ण व्यक्तीगत विचार करुन आपली कर्तव्ये आत्ताच जाणावीत आणि आपल्या स्वत:ला एक व्यक्तीगतपणे सजग नागरीक आणि त्यापुढेही जाऊन सजग आणि सक्षम वैद्य म्हणून घडवावे.

उद्याच्या आयुर्वेद प्रगतीपथावर आड येणारी दुसरी महत्वाची गोष्ट ती म्हणजे ''परंपरागत आयुर्वेद.'' आज आपल्याला बऱ्याच ठिकाणी परंपरागत आधीच्या पिढीतून पुढच्या पिढीकडे आलेला आयुर्वेद पाहावयास मिळतो. यामागे विचार करण्यासारख्या दोन गोष्टी आहेत. त्या म्हणजे एक ही की परंपरागत आयुर्वेद ज्ञान इतरांना मिळण्याचा अभाव आणि दुसरी म्हणजे परंपरागत आयुर्वेद म्हणजे अंतिम सत्य असे मानून पुढे चालणारा वाढता वैद्य आणि विद्यार्थी वर्ग. भविष्यात आयुर्वेदाची प्रगती खुंटु नये अशी इच्छा असणाऱ्या प्रत्येक वैद्य आणि विद्यार्थ्याने वेळी या दोन गोष्टींचा विचार करावा. कारण ज्ञान हे इतरांना दिल्यामुळे ते वाढतच अणि ते एक पुण्य कर्मच ठरेल आणि दुसऱ्या गोष्टीमध्ये विद्यार्थी दशेत असताना जिथून जिथून आयुर्वेद शिकता येईल तसा तो शिकावा. जळी स्थळी काष्टी पाषाणी या न्यायाने अध्यन करत राहावं.

आगंतु हेतूंचाही विचार तितकाच महत्वाच आहे, उद्याचा आयुर्वेद या दोन शब्दांचा विचार करताना आपल्या मनात उद्याचे नवीन उद्भवणारे हेतू आणि व्याधी यांचाही विचार करणं गरजेचं आहे. याला ग्रंथोक्त आधारही आहेत. ग्रंथकारांनी याप्रमाणे उल्लेखही केलेले आहेत. ''जनपदोध्वंस आणि अनुक्त व्याधी विचार'' हे त्यापैकीच दोन . आज आपल्याला सध्याची माणसाची लाईफस्टाईल समजून घेणं खूप महत्वाचं आहे. कारण तेच उद्याच्या व्याधीसाठीचे हेतू असणार आहेत. आज नवीन दिसणारे हेतू, नवीन व्याधी ग्रंथकारांनी अनुक्त व्याधी विचारात घेतली आहेत. अशावेळी योग्य तंत्रयुक्तांचा वापर करु योग्य संप्राप्ती पर्यंत पोहोचून चिकित्सा करणं हे अत्यत महत्वाचं आहे. उद्याच्या प्रत्येक वैद्याने ही बाब लक्षात ठेवून कर्तव्य पार पाडलं पाहिजे.

हट्टाने आयुर्वेदिय परिभाषेत बोलावे...लिहावे...तिच आपल्या सगळ्यांची पहिली पायरी आहे. दोन

Anant Ayurveda Pratishthan

आयुर्वेदीय वैद्यांमधील संभाषण हे शास्त्रोक्त परिभाषेतून झालं पाहिजे यामुळे ती परिभाषा हळुहळु का होईना पण जनमाणसांपर्यंत पोहोचेल आणि त्यांच्याकडूनही त्याप्रमाणे वापर होऊ शकेल. आयुर्वेदाबरोबरही संस्कृत भाषेवर तितकच प्रेम असायला हवं. तिला आत्मसात करण्याची इच्छा प्रत्येकाला असायला हवी. सांगण्यामागचा हेतू तुम्हाला आम्हाला सर्वांना माहित आहेच. आज आपला देश सोडून इतर देशातून लोक आपला आयुर्वेद जाणून घेण्यासाठी आतुर झालेले आहेत. एक आदरात्मकच बाब आहे. त्याबद्दल साशंकता नाहीच. पण जर आयुर्वेद व्यवस्थित मनापासून शिकायचा तर तो मूळ संहितांमधूनच शिकायला हवा. आणि मूळ संहिता समजून घ्यावयाची असल्यास, संस्कृत समजणे ही अत्यंत महत्वाची गोष्ट त्या परदेशवासीयांना आत्मसात व्हायला लागली आहे. आणि त्यानुसार ते संस्कृत भाषेचे यथार्थ ज्ञान संपादन करुन आयुर्वेदाचा अभ्यास इथे येऊन करतात. एवढ्या सारसार विचारातून एक गोष्ट नमुद करण्यासारखी आहे. आपला जन्मच या संस्कृत भूमीत झाला आहे. आपलं बीजच जर संस्कृत भाषेचं असेल तर आयुर्वेदाचा बहुअंगी वृक्ष आपण का नाही पूर्णपणे पाहू शकत? म्हणूनच आज प्रत्येक विद्यार्थ्याने संस्कृत भाषा आत्मसात करणं अत्यंत महत्वाच आहे. शास्त्राभ्यासासाठी.

या सगळ्यांमध्ये अजून एक भयावह बाब आठवते ती म्हणजे परदेशातूनच वाढत जाणारी आयुर्वेद मागणी. आज असंख्य परदेशी लोक इथे येऊन आयुर्वेदीय चिकित्सा घेतात. एवढच काय तर तेथील काही लोक आपल्या इथे येऊन आयुर्वेद शिकून स्वतःच्या देशात जातात. आणि तिथल्या जनमाणसात ते रुजवतात. आणि यातूनच आपल्याला आज परदेशातही आयुर्वेदीय विद्यापीठे पाहायला मिळत आहेत. ही सगळी आजची पार्श्वभूमी पाहता उद्याच्या प्रत्येक वैद्याने सजग राहणं अत्यंत गरजेच आहे. कारण आपलंच ज्ञान चोरुन ते स्वतःच्या देशात रुजवून मग ते आमचंच होतं. असे सिध्दांत ठोकणाऱ्यांचा इतिहासही काही विसरण्याजोगा नाही हे लक्षात ठेवावं.

भिषकाबद्दल बोलू तितके कमीच म्हणूनच त्याला तेवढं महत्वाच स्थान ग्रंथकारांनी देवू केलं आहे.

''भिषक्द्रव्याणिउपस्थाता रोगीपाद चतुष्टयम्।'' (अ.ऱ्हु. सू.१/२७)

द्रव्याबद्दल म्हणजेच औषधांबद्दलही जागरुकतेने विचार करणं गरजेच आहे. कारण रोगांवर वार करण्याचे शस्त्रच ते जणु काही. तलवारीशिवाय रणागणांवर लढायला जाण्यासारखं आहे, हे औषधाविना चिकित्सा देणं. आज बऱ्याच मोठ्या प्रमाणात आयुर्वेदिक फार्मास्युटिकल कंपनी तयार झालेल्या दिसतात. याच कारण म्हणजे आयुर्वेद चिकित्सा विश्वासाचा वाढता आलेख. पण आज आपल्या समोर असणार ज्वलंत प्रश्न म्हणज Without Any Adulteration, शुध्द औषधांची अल्प उपलब्धता. त्याने नक्कीच औषधाचे वीर्य कमी होते. आज चिकित्सेमध्ये अनेक वैद्यांना भेडसावणाऱ्या गोष्टीपैकीच ही एक.

एकीकडे वाढती लोकसंख्या, वाढत्या लोकसंख्येबरोबर वाढत जाणारा आयुर्वेदिय चिकित्सेवरचा विश्वास, वाढता वैद्यगण, वाढत्या रसशाला, वाढतं औषधिकरण त्यामागे वाढती आयुर्वेद औषधी वनस्पतींची मागणी. आणि दुसरीकडे वाढती लोकसंख्यया, वाढतं प्रदूषण, वाढती जंगलतोड, वाढतं मॉडर्न लाईफस्टाईल नष्ट होणाऱ्या औषधी वनस्पती, औषधी वनस्पतीची अल्प उपलब्धता. हा सगळा आलेख बघितला तर पुढच्या काही दिवसात औषधनिर्मिती बद्दल जी परिस्थिती निर्माण होईल ती चिंताजनक आसेल. आणि त्यातून वाढते अॅडल्ट्रेशन व सबस्टीट्युट्स. म्हणून या औषधी वनस्पती जपण्यासाठी, त्यांना वाढवण्यासाठी आपल्यालाच पावलं उचलली पाहिजेत. आणि ते आपलं परमकर्तव्य आहे. ज्या वैद्यांकडे किंवा आजच्या विद्यार्थ्यांकडे मुबलक शेतीजागा आहे. त्यांनी सरकारी नियमांचा फायदा घेवून मोठ्या प्रमाणात ''औषधी वनस्पतींची लागवड'' करुन उत्पादन केलं तर स्वतःच्या विश्वासातून तयार झालेल्या या वनौषधीही विश्वासर्हतेनेच काम करतील. सोबतच पर्यावरण रक्षण आणि वनौषधी उत्पादन व्यवसाय या दोन बाबींना इतर अनेक स्तरांवरुन प्रतिसा लाभू शकेल. आणि औषधाबद्दलची प्रत्येक वैद्याला असणारी

Anant Ayurveda Pratishthan

विश्वासार्हता देखील वाढेल.

दुसरा खटकणार मुद्दा म्हणजे प्रत्येक आयुर्वेदिय औषधांवर ठळकपणे लिहिली जाणारी रोगघ्नता. आणि त्यामुळेच सऱ्हास आयुर्वेदिक औषधालयात जाऊन तोहि Prescription शिवाय आयुर्वेदिय औषधे विकत घ्यायची. आणि वापरायची मग काही उपयोग झाला नाही की आयुर्वेदाला नवं ठेवून मग नंतर आयुर्वेदीय वैद्याकडेच जायच आणि औषध का घेतलं ? कोणी सांगितलं ? अशा वैद्याकडून विचारल्या गेलेल्या प्रश्नाला मग त्यांच उत्तर एकच असतं ''ते म्हणजे त्या सिरप बॉटलवर अथवा औषधावर असणाऱ्या लेबलवर दिल आहे ना, कशामध्ये वापरायचे ते. म्हणून घेतलं स्वत:च'' काय म्हणायच अशा कर्मदरिद्री लोकांना... त्यांना म्हणण्यापेक्षा या फार्मास्युटीकल कंपनींना त्यांच्याकडून अशी रोगघ्नता औषधांवर न लिहता मार्केटमध्ये उपलब्ध केली तर बऱ्याच घरच्या स्ववैद्याला (गैरसमज) आपोआपच आळा बसेल. आणि आयुर्वेदिय वैद्याच्या Prescription शिवाय औषधे घेणं यालाही आळा बसेल. अर्थात त्याला जोड हवी ती शासनाकडून अशाबद्दल निघणाऱ्या फतव्यांची. पण भविष्यात अशा अडचणींना सामोर जायचं नसेल तर आपल्यालाच विचार करुन वर सांगितल्याप्रमाणे मुळातूनच कठोर पावलं उचलणं गरजेचं आहे.

सोबतच विनापरवाना आयुर्वेदाच्या नावाखाली वाढत जाणारी रुग्णालये आणि रस्त्यावर बसून सऱ्हास गाड्यांवर विकली जाणारी आयुर्वेदिय औषधे. या दोन गोष्टींचा आजही गांभीर्याने विचार केला जातोय. आणि उद्याही तो करणं गरजेचं आहे. कारण असंच प्रमाण वाढत गेलं तर एकीकडून शास्त्राभ्यास करुनही दुसरीकडे अशा लोकांपुढे आपला आयुर्वेदाला किड लागू शकते याची जाणीव प्रत्येक उद्याच्या वैद्याला असायला हवी आणि आयुर्वेद म्हणजे जडीबुटी असं समीकरण पुर्णत: मोडीत काढायला हवं.

''उपस्थाता'' या संकल्पनेबद्दल आज आधुनिक वैद्यकिय संरचना अधिक सजग दिसते. आज मोठ्या प्रमाणात नर्सींग कोर्सेस उपलब्ध आहेत. आपल्या आयुर्वेदिय रुग्णालयात आयुर्वेदिय ठोकताळ्यांनीशी परिपूर्ण शिक्षण घेतलेला उपस्थाता असणे हे कौतुकास्पदच. आणि चतुष्टकाला आधार देण्यासारखचं. त्यासाठी भविष्यात आयुर्वेदातले नर्सिंग कोर्स चालू करुन एक ताडीस तोड प्लॅटफॉर्म तयार झाला तर वावगं ठरु नये. सोबतच आयुर्वेदिक फार्मसी कोर्स ही संकल्पनाही आपल्यासारखा नुकत्याच आकाशात झेप घेतलेल्या वैद्यांनी विचारात घेऊन सत्यात उतरवणं हे एक उद्याच्या आयुर्वेदासाठी पोषक असू शकेल.

याहूनही जरा वेगळा विषय इथे सांगावासा वाटतो. तो म्हणजे बदलत्या आधुनिक पध्दतींनुसार आपली रुग्णालयेही आधुनिक पध्दतींनी संरचित असलेली असावीत. आधुनिक नवनवीन यंत्र, उपयंत्र यांचा जास्तीत जास्त वापर करावा. हा पण ती उपयंत्रे आपल्या शास्त्र उपदेशांना बाधा आणणार नाहीत अशीच असावीत याची प्रथम पडताळणी आपल्याकडून व्हायला हवी. कारण अशा आधूनिक युगात आपल्या आयुर्वेदालाही आधुनिकतेतून पुढे आणणं हे आपल्या सगळ्यांच उद्याचं परम कर्तव्य आहे.

शेवटी...अशाप्रकारे आपल्या या आयुर्वेदाला एका उच्चांकावर नेताना स्वत:मध्ये एक आत्मविश्वास...उपजत आत्मविश्वास ठेवून ...प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या इतर शास्त्र उल्लंघन करणाऱ्यांपासून, शास्त्रद्रोह्यांपासून सावध राहून सजग राहून त्यांना ग्रंथाधारानेच हाणून पाडणे हे आपलं उद्याचं कर्तव्य आहे.

आचार्य चरकही उल्लेख करतात

''प्रत्यक्षं हि अल्पम् अनल्पम्हि अप्रत्यक्षं ।''

(चरक सू.१)

हे सगळं करताना आपला संपूर्ण आयुर्वेद वैद्यगण एकटवणं महत्वाचं आहे. तद्विद्य संभाषा घडवून आपण प्रत्यकाने मी आपल्या आयुर्वेदासाठी काय करु शकतो ? असा विचार केला पाहिजे.

Anant Ayurveda Prakashan

यातूनच मला वाटतं नवनवीन आयुर्वेदिय संघटनांची प्रतिष्ठापना होईल. आणि सर्व स्तरांवरुन आयुर्वेद गावागावात पोहोचेल, देशभर पोहोचेल आणि जगभर पसरेल. आणि नक्कीच आपला प्रत्येकांचा या आयुर्वेदासाठी आपल्या आयुर्वेदाचा, आपल्या शास्त्राचा झेंडा जगभर सर्वत्र रोवण्यासाठी सिंहाचा वाटा असेल, अशी मी अपेक्षा करतो.

आयुर्वेद हा शाश्वत आहे.
सोऽयं आयुर्वेद:शाश्वतो निर्दिश्यते।
(च.सू.३०/२७)

आयुर्वेद शास्त्र आधीही तेच होतं...आताही तेच आहे आणि उद्याही तेच असणार आहे. बदलत जात आहे ती सृष्टी... बदलतयं ती माणसं...माणसांचे विचार...त्यामुळे बदलत्या परिस्थितीला आपल्याला आधार देणारा आपला बापही आहे आयुर्वेद आणि माऊलीही आहे आयुर्वेद... फक्त त्याच्यावर बाप-माऊलीसारखी माया करणं, प्रेम करणं आणि विश्वास ठेवणं...हे आपले कर्तव्य ...

शेवट करता करता... ज्या गुरुंच्या प्रेरणेने आणि त्यांना स्मरुण सुरुवात केली तर शेवट करतानाही त्यांचे स्मरण झाल्याशिवाय राहवत नाही.

म्हणून त्या ज्ञानाच्या गंगोत्री विषयी

'' ब्रह्मणो हि समारब्धां आत्रेयाद्यै: सुपूजिताम्।
अस्मदाचार्यपर्यन्तां वन्दे गुरुपरम्पराम्।।
आयुर्वेदरतं वन्दे माधवाख्यं महागुरुम्।
आयुर्वेदामृतं सर्व शिष्येभ्यो य: प्रदत्तवान् ।।
द्रष्टा ज्ञानी दृष्टकर्मा कृतकर्मा तथैव च।
अध्यापको भिषक् श्रेष्ठो महान् संशोधकस्तथा ।।
गुणैरतै: समुदितै: यत्कार्यं प्रतनोध्दि स: ।
समुध्द्यर्थं हि कार्यस्य वयं नु प्रयतामहे ।।''

जय आयुर्वेद....!!!

Anant Ayurveda Pratishthan